| ४० | **तक्रार क्र. ७७**<br>श्री. धिरजपरब:- मीराभाईंदरमहापालिकाहद्दीतील मीरारोडपश्चिमयेथेनाझरेथआगरपरिसरातसरकारीवखाजगीजागेतकांदळवनपाणथळचाऱ्हास करून CRZचेउल्लंघन.<br>पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार. | • या तक्रारी संदर्भात अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी मिरा- भाईंदर महानगरपालिका यांनी ३ ते ४ वर्षापूर्वी माती व डेब्रिज भराव करुन रस्त्यालगत झाडांची लागवड केलेली आहे. सदर ठिकाणी ५० वर्षापासून पत्र्याचे घर बांधलेले आहे. या ठिकाणी नवीन बांधकामे झालेली नसून आज रोजी कांदळवनाचे नुकसान झालेले दिसून येत नाही. तसेच जमीन CRZ बाधित आहेत अगर कसे याबाबत वन विभागाचे अभिप्राय आवश्यक आहेत.<br>• त्या अनुषंगाने समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिके मार्फत सदर ठिकाणी असलेला असलेला भराव हटविण्याच्या व सदर ठिकाणी पुन्हा भराव होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका, जि. ठाणे.<br>**अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा अहवाल प्राप्त** |
| ४१ | **तक्रार क्र. ७९**<br>श्री. धिरज परब: - मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील नवघर गाव मागील सरकारी खाजण सर्वे क्र. १५मध्ये मनपाने पाणथळ, कांदळवन व सीआरझेड १ मध्ये बेकायदा | • या तक्रारी संदर्भात अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्या अहवालानुसार मौजे नवघर स.नं. १५ मधील अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेले तक्रारीचे ठिकाण हे शंकर नारायण महाविद्यालयाचे क्रिडांगणाच्या उजव्या बाजूस असलेल्या जागे संबंधीत असून प्रत्यक्ष स्थळ पाहणी दरम्यान अर्जदार यांच्या तक्रारी अर्जात नमूद केल्याप्रमाणे चौकशी केली असता अर्जदार यांच्या | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे)<br><br>**अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा अहवाल** |

| | | | |
|---|---|---|---|
| | टाकलेला कचरा, भराव काढून कांदळवनाची लागवड. पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार | अर्जानुसार सदर ठिकाणी कांदळवना लगत उभारण्यात आलेले श्री रामा रामनाथ यादव यांचे तबेल्याचे अंदाजे 40 x 40 फुट तात्पुरती शेड व त्यालगत असलेल्या चाळीचे बांधकाम दिसून आले. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेचे शौचालयाचे बांधकाम करण्यात आलेले आहे तसेच आज रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी दरम्यान कांदळवनाची कत्तल अथवा ऱ्हास होत असल्याबाबत आढळून आलेले नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिके मार्फत सदर ठिकाणी बांधलेले अनधिकृत शौचालय तोडण्याबबत कार्यावाही करण्याच्या सूचना दिल्या. | **प्राप्त** |
| ४२ | **तक्रार क्र. ८१** हिंद सागर – **दि २९.०५.२०१९**<br>भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन जवळ CRZ च्या मोकळया जमीनी वर माती भराव बंद करणेबाबत. | • समितीने या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी ठाणे आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना एकत्र स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>• या तक्रारी संदर्भात **अपर तहसिलदार मिरा-भाईंदर** यांच्या दि. ११.०३.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर जमीन मिळकत न.स.न. ३४०/१ क्षेत्र १९-२१-०० हे. आर, ७/१२ चे कब्जेदार सदरी बंदरवाडी आगार व न.सनं. ३४०/ २ क्षेत्र ०-६३-०हे.आर. ७/१२ चे कब्जेदार सदरी बंदरवाडी आगार अशी नोंद आहे. सदर जमीन बंदवाडी आगार सॉल्ट विभागाची, केंद्र शासन यांचे मालकीची आहे. तसेच सदर जमीन मिठागरासाठी परवानाधाक श्री. विरेंद्र चंद्रकांत शहा, हेमंत चंद्रकात शहा, प्रशांत चंद्रकांत शहा व इतर यांनी दिलेली आहे अशी उप-नमक अधिक्षक श्री. विजय बहादुर अगरवाल यांनी माहिती दिली. सदर ठिकाणी आज रोजी गरुलंच होमच्या लगत अनाधिकृत दुकानाचे पत्रा शेड गाळयाचे बांधकाम केलेले आहे.<br>• तरी या तक्रारी अर्जातील विषयाबाबत सदर सं.नं. ३४० या जमीनीवर झालेले बांधकाम सॉल्ट विभागाची जमीन असल्यामुळे त्यांचेमार्फत निष्कासनाची कार्यवाही करणे योग्य होईल. तसेच सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झाल्याचे दिसून येत नाही. | जिल्हाधिकारी ठाणे आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका –<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ४३ | **तक्रार क्र. ८२**<br>श्री. प्रसाद खाले<br>११.०६.२०१९Destruction of Mangroves by dumping of debris and reclamation at Kharegaon, Kalwa | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांच्या दि. २१.०१.२०२० रोजीच्या अहवालानुसार मौजे खारेगाव येथील सर्वे नं ५९/९ ही जागा पाठबंधारे विभागाच्या ताब्यात असून सदर जागी २००० चौ. मी मध्ये भराव करण्यात आल्याचे निदर्शनास आले. सदर ठिकाणी आज रोजी कांदळवनाची तोड झालेली नाही. परंतु कांदळवनापासून ५० मी च्या आत अनधिकृत बांधकाम भंगारची दुकाने सुरु केल्याचे निदर्शनास आले.<br>• त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका यांच्या यंत्रणेमार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी ठाणे आणि<br>**ठाणे महानगरपालिका** |

| | | | |
|---|---|---|---|
| ४४ | **तक्रार क्र. ८९** श्री. जतीन दधीच दि. ०४.०८.२०१९ Destruction of mangroves, illegal land filling and construction of Chawl (10 rooms) at Government Land, Shivneri, Village Rai, Bhayander West, by Land/ Chawl Mafia Pravin Tiwari and Meghnath Patil. | • या तक्रारी संदर्भात आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि. १३.११.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर जागेची पाहणी केली असता सदर बांधकाम हे कांदळवन तोडून केल्याचे आढळून आलेले नाही. सदरच्या बांधकामावर दि. १९.०७.२०१९ रोजी तोडक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर जागेवर पुन: श्च १० रुमचे बांधकाम केल्याचे तसेच सदरचे बांधकाम हे रहिवासी व्याप्त झाल्याचे आढळून आलेले आहे.<br>• सदरचे बांधकाम हे महसूल विभागाच्या जागेवर असल्यामुळे अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करीता महसूल विभागास कळविण्यात आले आहे.<br>• तसेच अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी चाळ स्वरुपाचे पत्र्याचे बांधकाम असून एकुण १० खोल्यांपैकी काही खोल्यांचे बांधकाम महानगरपालिका निष्कासीत करण्यात आलेले आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने उर्वरित बांधकाम मिरा-भाईंदर महानगरपालिक यांच्यामार्फत अतिक्रमण पथकाकडून निष्कासित करण्याचे निर्देश दिले आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर मनपा, जि. ठाणे.<br>**अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा अहवाल प्राप्त**<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ४५ | **तक्रार क्र. ९०** श्री. के.एस. शुल्का - दि. १३.०८.२०१९ Debris and Garbage dumping in the Creek and on the Mangroves in Sector-11, Belapur | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर मनपा, जि. ठाणे.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४६ | **तक्रार क्र. ९७ श्री. आरीफ इराकी दि.०९.०८.२०१९** Complaint against the Collector of thane for causing Contempt of Court for their no action against illegall sand mining and thereby abetting to the destruction of mangroves and environment at Mumbra Creek (Along Ulhas River) At Retibunder and Desai Khadi near Chuha Pal in Diva, Thane. | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ४७ | **तक्रार क्र. १००** श्री. धिरज परब -दि.14.10.2019 भाईंदर पश्चिम येथे बजरंग नगर भागात महापालिकेने कांदळवन क्षेत्रात बेकायदेशीर भराव करून काँक्रीट टाकी, | • या तक्रारीबाबत अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्या अहवालानुसार सदरचे काम करताना आजरोजी कांदळवनाचे नुकसान झालेले दिसून येत नाही. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष स्थळ पाहणी व अर्जदार यांचे मागणीनुसार नमुद ठिकाणी प्रस्तुत बांधकाम पुर्णपणे तोडणेबाबत कारवाई तात्काळ | जिल्हाधिकारी, ठाणे.<br>अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा<br>**(अहवाल प्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | स्लॅब टाकून शौचालयाचे बांधकाम केल्या प्रकरणी. | करणेबाबत कळविले आहे.<br>• त्या अनुषंगाने या तक्रारीबाबत समितीच्या अध्यक्षांच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. | |
| ४८ | **तक्रार क्र. १०४** श्री. धिरज परब दि.19.11.2019<br>भाईंदर पश्चिम येथे एसटी डेपोच्या आरक्षणातील कांदळवन नष्ट करून झाडे तोडणे तसेच बेकायदा डेब्रिस चा भराव व थर्माकोल आदींचा कचरा टाकून पर्यावरणाचा ऱ्हास प्रकरणी | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर हानगरपालिका **(अहवाल अप्राप्त)** |
| ४९ | **तक्रार क्र. १०५** श्री. धिरज परब दि. 05.03.2019<br>चौक जेट्टी जवळ बालेपीर शाह दर्गा लगत कांदळवन व सरकारी जागेत पर्यावरणाचा ऱ्हास. | • या तक्रारी संदर्भात अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांनी केलेल्या दि.०३.०१.२०२० रोजी केलेल्या स्थळ पाहणीनुसार स्थळ पाहणी दरम्यान चौक जेट्टी बालेपीर शाह दर्गा येथे पाहणी केली असता सदर दर्गा मौजे चौक येथील सर्वे नं. ७ या सरकारी जमिनीवर अंदाजे १०० वर्षापासून असून आज रोजी दर्गाचे नव्याने नुतणीकरणाचे काम सुरु आहे. सदर दर्गा कांदळवन पासून ५० मीटरच्या आत आहे. तसेच आज रोजी सदर ठिकाणी कांदळवनाची तोड झालेली दिसून येत नाही.<br>• त्या अनुषंगाने या तक्रारीबाबत समितीच्या अध्यक्षांच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा **(अहवाल प्राप्त)**<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका |
| ५० | **तक्रार क्र. १०७** हिंद सागर, दि. २८.११.२०१९<br>जिल्हा ठाणे भाईंदर पश्चिमेच्या उत्तम रोड, जय बामन देव नगर, मुर्धा खाडी जवळील नाल्या शेजारी रामवृक्ष चौधरी नामक भु माफियाद्वारे अवैध्य रित्या कांदळवनाची तोड करुन (एका खोलीचे) बांधकाम केल्याबाबत. | • या तक्रारी संदर्भात अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांनी केलेल्या दि.०३.०१.२०२० रोजी च्या स्थळ पाहणीनुसार अहवालानुसार सदर ठिकाणी डेब्रीज भराव अंदाजे १०० चौ. फुट असून सदर कच्चे घर राजेश कोळी यांचे आहे. सदर घर अनाधिकृत असून बामन नगर या वस्तीच्या शेवटच्या भागात अनाधिकृत खोल्याचे बांधकाम झालेले असून श्री. रामरुक्ष चौधरी यांनी अनाधिकृत केलेले बांधकाम मिरा-भाईंदर महागनरपालिका यांनी निष्कासित केले आहे. तसेच सदर ठिकाणी आज रोजी कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून येत नाही.<br>• सदर सर्वे नं. १११ या सरकारी जमीनीवर या व्यतिरिक्त अनेक खोल्यांचे बांधकाम झालेले आहेत. सदर बांधकाम निष्कासीत करण्यासाठी महानगरपालिका अतिक्रमण विभागाकडून कार्यावाही करणे आवश्यक आहे. | १. जिल्हाधिकारी, ठाणे. अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा **(अहवाल प्राप्त)**<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका |
| ५१ | **तक्रार क्र. १०८ श्री. रोहीत जोशी दि.०८.१२.०१९**<br>ठाणे महानगरपालिकेतर्फे कळवा येथील कंदळवनांची कत्तल | • या तक्रारी बाबत ठाणे महानगरपालिका यांच्या अहवालानुसार कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालया शेजारी रेल्वे ट्रॅक लगत सर्वे क्र. ४२५ स्पोर्टस् कॉप्लेक्स विकसीत करण्याचे काम ठाणे महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आलेले आहे. | जिल्हाधिकारी ठाणे आणि ठाणे महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदर कामास मे. बिलीव्ह इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.ली. यांना काम सुरु करण्याचे आदेश देण्यात आले आहेत व राज्य पर्यावरण प्रभाव आकलन प्राधिकरण (SEIAA) या विभागाकडील मान्यता प्राप्त झालेली आहे.<br>• सदर कामाच्या ठिकाणी मोठया प्रमाणात अनधिकृत शेड व व्यवसाय सुरु होते. तसेच मोठया प्रमाणात समाजकंठकामार्फत डेब्रिज टाकण्यात आले होते.<br>• सदर ठिकाणचे शेड काम सुरु करणेपूर्वी अतिक्रमण विभागामार्फत निष्कासीत करुन अतिरिक्त डेब्रिज ठेकेदारामार्फत सदर ठिकाणावरुन काढून घेण्यात आलेले आहे. सदर जगोवर नाल्यामध्ये पडलेले डेब्रिज ठेकेदारामार्फत काढून घेण्यात आले असून नाला पुर्ववत करण्यात आलेला आहे.<br>• सदर रेल्वेलाईन लगत MMRDA चे मंजूर निविदाकार मे. धनलक्ष्मी डेव्हलपर्स यांचे विटाका ते ठाणे स्कायवॉक बांधण्याचे काम सुरु असून सदर कामासाठी लागणारे साहित्य, मशिनरी तयार करणेकामी संबंधीतांमार्फत सदर ठिकाणी भराव घालण्याचे काम सुरु आहे.<br>• तक्रारदार यांनी तक्रारीत नमूद केलेली बाब महापालिकेशी निगडीत नसून ती MMRDA यांच्याशी निगडीत असल्याने सदर कामासाठी MMRDA यांना सदरचे काम करण्याबाबत परवानगी दिली की नाही या बाबत अहवाल सादर करण्याच्या सचूना समितीने दिल्या आहेत. | |
| ५२ | **तक्रार क्र. १०९ श्री. रोहीत जोशी दि.०८.१२.०१९**<br>कोलशेत येथे खाडीकिनारी कांदळवनाशेजारी बेकायदेशीर रित्या काँक्रीटचे बांधकाम केल्याबद्दल ठामपा वर कारवाई करणेबाबत | • या तक्रारीबाबत ठाणे महानगरपालिका यांच्या अहवालानुसार सदरचे काम हे ठाणे स्मार्ट सिटी लि. यांचे मार्फत सुरु नसून सदरचे काम हे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे मार्फत सुरु आहे. तसेच याबाबत मेरी टाईम बोर्डाकडे चौकशी केली असता सदर बांधकामाबाबत पर्यावरण विभागाची पनवानगी प्राप्त असल्याचे सांगण्यात आले आहे.<br>• या तक्रारीबाबत ठाणे महानगरपालिका यांच्या दि.०४.०३.२०२० रोजीच्या अहवालानुसार सादर जागा बफर झोन असून, चालू असलेले Gabbian Wall (Ecofriendly Strecture) तयार करण्याचे काम सुरु आहे. सदर कोलशेत येथील वॉटर फ्रँट च्या कामासाठी ठाणे महानगरपालिकेच्या सर्व मंजूऱ्या प्राप्त केलेल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे आणि<br><br>**ठाणे महानगरपालिका (अहवाल प्राप्त)** |
| ५३ | **तक्रार क्र. ११५** श्री. सुनील अगरवाल<br>दि. 30.12.2019<br>Destruction of Mangroves in Sector 60, Nerul under CIDCO jurisdiction | • सदर ठिकाणी सिडको यांच्या मार्फत सुबाबुळ झाडे असून ती कापण्याची परवानगी देण्यात आली आहे असे सांगितले. या तक्रारीबाबत सदस्य श्री. विनोद पुन्शी यांनी सदर ठिकाणी सुट्टी च्या दिवशी मोठया प्रमाणात भराव होत असल्याचे सांगितले.<br>• वनपरिक्षेत्र अधिकारी, नवी मुंबई यांचे अहवालानुसार | जिल्हाधिकारी ठाणे व<br>सिडको<br>**(अहवाल अप्राप्त)**<br>वनपरिक्षेत्र अधिकारी, नवी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदरचे क्षेत्र अधिसूचीत राखीव कांदळवन क्षेत्रातील नाही. तसचे इतर पाहणी केली असता कोणत्याही प्रकारचे कांदळवन प्रजातीच्या वृक्षाची तोड झाल्याचे दिसून आलेले नाही. | मुंबई<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ५४ | **तक्रार क्र. ११६** श्री. सुनील अगरवाल<br>दि. 04.12.2020<br>Mangrove and wetlands destruction near Hiranandani Estate Thane. | • या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिकेच्या दि.०४.०३.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर प्रकरणी तहसिलदार यांच्या समवेत पाहणी केली असता सदर जागा पाणथळ असून मोठया प्रमाणात अवैधरित्या C & D वेस्ट ची भरणी झाली आहे असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. परंतु सदर जागा पाणथळ म्हणून अधिसूचित झालेली नाही. C & D वेस्ट बाबत SWM २०१६ नियमानुसार ठामपा तर्फे कार्यावाही करण्यात येईल तसेच कचऱ्याचा भराव केलेल्या ठिकाणापासून १ ते १.५ कि. मी अंतर कांदळवन क्षेत्र आहे. तरी कांदळवनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. | जिल्हाधिकारी ठाणे<br>**ठाणे महानगरपालिका अहवाल प्राप्त** |
| ५५ | **तक्रार क्र. ११७,** श्री. संतोश डॅनिअल,<br>दि. 15.01.2020<br>Encroachment on Mangroves Land in Sect-12 Ghansoli. | • या तक्रारी बाबत समितीने सिडको यांच्या दि. ०८.१०.२०२० रोजीच्या स्थळ पाहणी अहवालानुसार कांदळवनापासून बऱ्याच अंतरावर घनकचरा टाकलेला आढळून असून घनकचरा हटविण्यात आला आहे. | जिल्हाधिकारी ठाणे<br>व<br>सिडको<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ५६ | **तक्रार क्र. १२४ श्री. अजीत पाटील दि.27.02.2020**<br>मौजे कोपरी ता. जि. ठाणे या खाजण जमिनीवर कांदळवनाची कत्तल करुन ठाणे महापालिका भरणी करत असलेबाबत. | • या तक्रारीबाबत ठाणे महानगरपालिका यांच्या अहवालानुसार सदर कामाचे ठिकाणी करण्यात आलेला भराव हा कंत्राटदारामार्फत करण्यात आला नसून, स्मार्ट सिटी अंतर्गत सुरु असलेल्या गावदेवी येथील वाहनतळाच्या खोदकामातून प्राप्त झालेल्या उत्खलनातील मुरुमचा भराव ठाणे स्मार्ट सिटी लि. मार्फत करण्यात आला आहे.<br>• तक्रारदार श्री. अजित पाटील यांनी खाजण जमिनीवर कांदळवनाची कत्तल करुन ठाणे महानगरपालिका भरणीकरत असलेल्या तक्रारीत तथ्य नाही असे नमूद केले आहे. | जिल्हाधिकारी ठाणे<br>ठाणे<br>महानगरपालिका<br>जि. ठाणे.<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ५७ | **तक्रार क्र. १२५** श्री. शिवम श्रीवास्तव दि.१५.०६.२०२०<br>MANGROVES DESTRUCTION in Village Mhatardi, Diva, Thane | • वन विभागामार्फत केलेली कार्यवाही: - वनपरिक्षेत्र अधिकरी भिवंडी यांचे दि. १०.०८.२०२० रोजीच्या अहवालानुसार ॲव्हीसिनिया मरिना या प्रजातीचे कांदळवन झाडांची तोड जवळपास २ ते ३ महिन्यापूर्वी मुळासकट तोडलेली दिसून आली.<br>• तसेच या तक्रारी बाबत ठाणे महानगरपालिका यांच्या दि. १२.१०.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून आलेले नाही. | जिल्हाधिकारी<br>ठाणे,<br>महानगरपालिका<br>जि. ठाणे.<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ५८ | **तक्रार क्र. १२६** श्री. धिरज परब दि.२३.०६.२०२०<br>भाईंदरच्या उत्तन येथील पाली ते करई पाडा - उत्तान नाका | • या तक्रारी संदर्भात अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांनी केलेल्या दि.१४.१०.२०२० रोजी च्या स्थळ पाहणीनुसार अहवालानुसार मौजे उत्तन जि. ठाणे येथील जमीन सर्वे नं. २९४ ए १ मध्ये अंदाजे ३० ते ४० वर्षापासूनचे | जिल्हाधिकारी ठाणे<br>आयुक्त मिरा-भाईंदर<br>महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | दरम्यानच्या सरकारी जागेतील नवीखाडी पात्र व परिसरातील कांदळवनाची मोठ्या प्रमाणात तोड करून भराव, कचरा टाकणे व बांधकामे केल्या प्रकरणी | बांधकाम दिसून येते. सदर बाधकामामुळे पाणी बदं झाल्यामुळे खाडीतील कांदळवनाची झाडे सूकलेली आढळून आली आहेत. तसेच सदर ठिकाणी नवीन कांदळवनाचे तोड दिसून आलेली नाही.<br>• सदर ठिकाणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून गाळ, कचरा काढून पाण्याचा प्रवाह सुरु करण्याची कार्यवाही अपेक्षीत आहे. | जि. ठाणे.<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ५९ | **तक्रार क्र. १३०** श्री. प्रसाद खाले Destruction of Mangroves near Sandstone Building, Unique Gardens, Mira Road. | • या तक्रारीबाबत अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्यादि. २९.१० २०२० रोजीच्या अहवालानुसार सदर जमीनीवर मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी गार्डन छाटनी केलेली झाडे विखुरलेल्या स्वरुपात टाकण्यात आली असून २ ते ३ गाडया डेब्रिज अंदाजे १ वर्षापूवी टाकण्यात आले असल्याची माहिती जागेवर उपस्थित असलेल्या उद्यान अधिक्षक, श्री. हंसराज मेश्राम व उपआयुक्त मुख्यालय श्री. अजीत मुठे यांनी दिली. सदर ठिकाणी कांदळवनास कोणत्याही प्रकारे नुकसान झालेले नाही.तसेच सदर ठिकाणी असलेले डेब्रिज मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून हटविण्याची कार्यवाही तात्काळ करणेबाबत कळविले आहे. | जिल्हाधिकारी ठाणे<br>जि. ठाणे.<br>मिरा-भाईंदर महानगरपालिका<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ६० | **तक्रार क्र. १३३ श्री. आदर्श कुमार दि.१२.०८.२०२०** Destruction of Mangroves and Dumping of solid waste and encroachments at Balkum, Thane | • या तक्रारीबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी भिवंडी यांच्या दि. १७.०९.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी रोड लगत बाळकुम पाईपलाईन रोड लगत ५ ते ६ फूट एवढया कचऱ्याचा व मातीचा भराव टाकलेला दिसून आला. सदर ठिकाणी कांदळवन नाही परंतु अंदाजे १५ ते २० मीटर अंतराव कांदळवन प्रजाती निदर्शनास आल्या आहेत. लॅटीटयुड 19 14 24 व लॉन्जीटयूड एन 72 59 49 ई येथे रोड लगत कंपाऊंड करुन तेथे पत्रयाचे शेड बांधले आहे. त्याच्या जवळ कांदळवन प्रजाती दिसून आले आहेत. सदरची जागा ही महसूल विभागाच्या ताब्यात आहे व तेथे अतिक्रमण होत असल्याचे निदर्शनास आले आहे.<br>• त्या अनुषंगाने सदर ठिकाणी होत असलेले अनधिकृत बांधकाम निष्कासन करण्याचे जिल्हाधिकारी ठाणे यांना निर्देश दिले आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे<br>ठाणे महानगरपालिका<br>जि. ठाणे.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ६१ | **तक्रार क्र. ३०** श्री. विनोद पुन्शी- दि.१७.१२.२०१८ Effluents released in mangroves raise a stink- T.O. I. Navi Mumbai Report dated 16.12.2018 | • समितीने या तक्रारीबाबत MPCB च्या नोडल अधिकाऱ्यांसोबत स्थळ पाहणी करण्यास सांगितले व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना मागील बैठकीत दिल्या होत्या.<br>• परंतु MPCB मार्फत कोणीही प्रतिनिधी उपलब्ध नसल्याने तक्रार अद्याप प्रलंबित आहे. | जिल्हाधिकारी ठाणे<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ६२ | **तक्रार क्र. ५६** श्री. सुनिल अगरवाल –दि.12.02.2019 Systematic Destruction of Mangroves in Nerul | • या तक्रारीबाबत सिडको यांच्या अधिकाऱ्यांनी तक्रारदारासोबत दि.०७.०९.२०१९ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली असून सदर ठिकाणी कांदळवनाजवळ डेब्रिज टाकण्यात आले आहे. सिडको कंपाऊंडच्या | जिल्हाधिकारी ठाणे<br>सिडको<br>**(अहवाल प्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | Seawoods behind TSC maritime institute. | बाजूला असलेले डेब्रिज काढण्यात आले आहे. | |
| ६३ | **तक्रार क्र. ८६श्री. विनोद पुन्शी दि ०९.०५.२०१९** Wetland being filled up overnight Near Indian Institute of Geo magnetism campus. पाणथळ समितीमधील तक्रार | • या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवर स्थळ पाहणी झाली असून सदर ठिकाणी असलेला भराव हा काढण्याची प्रक्रिया सुरु आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारी बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | सिडको **(अहवाल अप्राप्त)** |
| ६४ | **तक्रार क्र. १२७** श्रीम. श्वेता भट दि.०२.०६.२०२० Destruction of mangroves west of Satyam Imperial Heights, Ghansoli - Sector ११, Navi Mumbai. | • वन परिक्षेत्र अधिकारी नवी मुंबई यांचे दि. 03.06.2020 रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिकेची Sport Complex करिता राखीव जागा आहे. सदर जागा ही सिडको च्या मालकीची असून सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही. | सिडको आणि आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका |
| ६५ | **तक्रार क्र. १३५श्री. ऐरींडोम बॅनर्जी दि.१४.१०.२०२०** Destruction of mangroves at Hiranandani estate Thane | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे |

**रायगड जिल्हयातीलकांदळवन तक्रारी**

| तक्रार क्र. | तक्रार | करावयाचीकार्यवाही | अंमलबजावणीकरणारीयंत्रणा |
|---|---|---|---|
| ६६ | तक्रार क्र. ३७ श्री. नंदकुमार पवार- दि.१९.०६.२०१८ 2) Coastal road - There are huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by blocking of tidal water flow. | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या अहवालानुसार सदर कामी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकारणाने राष्ट्रीय महामार्ग ४ ब लगत नवघर, चाणजे, द्रोणागिरी नोड ते करंजापर्यत महामार्ग तयार करताना नष्ट होणाऱ्या कांदळवनाबाबत आवश्यक असणाऱ्या केंद्र सरकार, पर्यावरण खाते यांचेकडून दि. ३ फेब्रुवारी, २००९ रोजी पर्यावरण दाखला घेतला आहे. MRSAC कडील नकाशानुसार सदर ठिकाणी कांदळवनाची तोड झाल्याचे आढळून येत नाही.<br>• त्या अनुषंगाने सदर प्रकरणी कांदळवनाची तोड अथवा ऱ्हास न झाल्याने तक्रार निकाली ठेवणेस हरकत नाही असे नमूद केले आहे. | जिल्हाधिकारीरायगड |
| ६७ | **तक्रार क्र. ६२** दि.८.०३.२०१९ श्री. हरेश नरेश कडू गोफण नदी किनारी असणारे कांदळवनाची (खारफुटी) व झाडांची बेकायदेशीर तोड केल्याबाबत. | • या तक्रारी संदर्भात वन विभाग रोहा यांच्या दि.१३.०५.२०१९ अहवालानुसार तोड झालेले ठिकाण हे वन विभागाच्या ताब्यातील नसून ते मालकी क्षेत्रात असल्याचे निदर्शनास आले आहे.<br>• जिल्हाधिकारी रायगड तहसिलदार महसूल यांच्या दि.१५.१०.२०२० रोजीच्या अहवालानुसार गोफण गावाच्या खाडी किनारी बांधाचे काम करण्याकरिता खारभूमी विभागाकडून कार्यवाही करण्यात आली आहे. | जिल्हाधिकारी, रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदर बांधाच्या बाजूला काही ठिकाणी कांदळवनाची तोड व कांदळवनाच्या फांद्याची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु तालुका स्तरीय समितीमार्फत झालेल्या स्थळ पाहणीमध्ये सदर ठिकाणी कांदळवनाची तोड झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. अर्जदार हरेश नरेश कडू यांना शासनाकडून सदर योजनेचे काम मिळाले नाही म्हणून सदरची तक्रार केली असल्याचे पोलीस निरिक्षक, रोहा यांनी नमूद केले आहे. | |
| ६८ | तक्रार क्र. ८८ श्री. नंदकुमार पवार.दि. ३०.०७.२०१९ Chopping of mangroves stretch at pagote, Uran | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना समितीने FIR ची कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नाही असे सांगितले.<br>• तहसिलदार उरण यांच्या अहवालानुसार मौजे पागोटे येथील NMSEZ च्या मालकीचे एकूण सुमारे ७ ते ८ एकर क्षेत्रापैकी ३ एकर जागेवरील कांदळवन तोडलेल्या स्थितीत दिसून येते.<br>• सदर बाबतीत दि.२२.११.२०१९ रोजी मंडळ अधिकारी उरण यांनी सविस्तर पंचनामा केला असून तेथील परिस्थितीवरुन NMSEZ च्या पदाधिकाऱ्यांनी तेथील कांदळवन तोडून पर्यावरणाची हान केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्या विरुध्द FIR No. 0289/2019 दि. १९.१२. २०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>• त्या अनुषंगाने सदर ठिकाणी Replantation ची संख्या ही ४४४ असल्याने ३ एकर करिता एकूण ५३३३ कांदळवनाची झाडांची लागवड करण्याच्या NMSEZ यांना सूचना दिल्या आहेत.<br>• सरपंच ग्रामपंचायत यांच्या अहवालानुसार श्री. निलेश् पाटील, व श्री. प्रदिप पाटील यांचे विरुध्द पागोटे येथील भराव केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. | जिल्हाधिकारी, रायगड |
| ६९ | **तक्रार क्र. ९२** श्री. नंदकुमार पवार.<br>दि. ३०.०७.२०१९ उरण तालुक्यामध्ये विकास व पायाभूत सुविधांच्या नावाने होणाऱ्या खाजण जमीनी व न भरुन येणाऱ्या पर्यावणाच्या ऱ्हासासंबंधी आपले लक्ष वेधणेबाबत. | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या दि. १३.०१.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी JNPT आणि NH4बी या महामार्गालगत पंजाब कॉन्वेअरच्या बाजूला असलेल्या नमूद ठिकाणी कांदळवनाचा नाश झालेला नसल्यामुळे तक्रारदाराचा अर्ज निकाली ठेवण्यात यावा असे नमूद केले आहे. | जिल्हाधिकारी, रायगड |
| ७० | **तक्रार क्र. ९३** श्री. नंदकुमार पवार.<br>दि. २८.०८.२०१९Municipal solid waste dumping on | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्राप्त अहवालानुसार उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा येथे दि.२२.११.२०१९ रोजी परिक्षेत्र वन अधिकारी उरण, मंडळ अधिकारी उरण, तलाठी सजा उरण, तसेच तक्रारदार श्री. नंदकुमार | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२. सिडको, नवी मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| | Mangroves | पवार यांच्या समवेत संयुक्त स्थळ पाहणी करण्यात आली असून सदर ठिकाणी कांदळवनाचा नाश झाल्याचे आढळून आलेले नाही.<br>• तसेच जिल्हाधिकारी रायगड यांनी सदरची जागा कांदळवना लगत असल्यामुळे कांदळवनाचा नाश होऊ शकतो. त्यामुळे जिल्हाधिकारी रायगड यांनी उरण Dumping Ground साठी वेगळी पर्यायी जागा म्हणून सिडको क्षेत्रातील जागेची निवड करण्याबाबत सिडकोच्या संबंधीत अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. | |
| ७१ | **तक्रार क्र. ९९ श्री. विनोद पुन्शी .२०.०९.२०१९**<br>T.O.I. Navi Mumbai report on 20/09/2019 regarding mangroves destruction off S-P adjacent to Roadpali road. | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या दि. २५.०८.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार रोडपाली येथील कांदळवन परिसरात कोणत्याही प्रकारे डेब्रिज अथवा तत्सम अन्य कोणत्याही वस्तु स्थळपाहणी वेळी आढळून आलेले नाही. | जिल्हाधिकारी रायगड |
| ७२ | **तक्रार क्र. १०१** श्री. दिपेश म्हात्रे दि. 06.11.2019<br>DUMPING OF CITY WASTE ON MANGROVE. | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या दि. २५.०८.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार उरण तालुक्यातील मोरा रोड बोरीपाखाडी येथील कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत तक्रारीच्या अनुषंगाने परिक्षेत्र वन अधिकारी उरण, मंडळ अधिकारी उरण, तलाठी सजा उरण तसेच श्री. बी.एन. कुमार व मोरा येथील रहिवासी यांचे समवेत संयुक्त स्थळपाहणी करण्यात आली असून उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे अहवालानुसार आजमितीस नमूद ठिकाणी कांदळवनाचा नाश झाल्याचे आढळून आलेले नाही. | जिल्हाधिकारी, रायगड |
| ७३ | **तक्रार क्र. १०२** बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.07.11.2019Uran mangrove zone turns into massive garbage dumping ground | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, रायगड<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ७४ | **तक्रार क्र. ११३** बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि. 25.12.2019<br>JNPT violates CRZ norms, destroys mangroves | • तहसिलदार उरण व मुख्य व्यवस्थापक, JNPT यांच्या अहवालानुसार JNPT कांदळवनाच्या फेरफार (Diversion) करण्यासाठी १९.५ कांदळवनाचे फेरफार (Diversion) FCA अंतर्गत परवानगी मिळाली आहे.<br>• तसेच फेज २ मध्ये त्यांना Environment clearance and CRZ clearance मिळाले होते सदर ठिकाणी सध्या काम करण्यात आले आहे. सदर ठिकाणी कांदळवनाची तोड झालेली नसून JNPT मार्फत काम करताना कोणत्याही प्रकारे कांदळवनाचे नुकसान होणार नाही असे नमूद केले आहे. तथापि,नेव्हिगेशनल चॅनेलमधील हार्बर एरिया वगळून मच्छीमारांना मासेमारीच्या कार्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. | जिल्हाधिकारी रायगड आणि JNPT |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • तसेच Eco park तयार करण्याबाबत कांदळवन प्रतिष्ठानामार्फत नियोजन करण्यात आले आहे.त्या अनुषंगाने समितीच्या अध्यक्षांच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. | |
| ७५ | **तक्रार क्र. ११४** श्रीमती कस्तुरी गांधी दि. 26.12.2019 Destruction of Mangroves at NMSEZ at Panje Wetlands, Uran. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांच्या दि. ०२.०१.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदरची जागा ही सिडको यांच्या मालकीची असून त्यांच्याद्वारे NMSEZ यांना देण्यात आली आहे तसेच मौजे पाणजे येथील जागा ही पाणथळात मोडत नसल्याचे दिसून येते. सदर ठिकाणी आज रोजी पाणी व चिखल स्वरुपात जमिनीवर गाळ पसरलेला आहे. सदरचे पाणी लहान सिमेंटचे चॅनलद्वारे एका बाजूने वाहत असल्याचे दिसून येत आहे. तसेच याप्रकरणी उरण पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. २८६ दि.१६.१२.२०१९ रोजी दाखल करणेत आलेला आहे. | जिल्हाधिकारी, रायगड |
| ७६ | **तक्रार क्र. १२३ श्री. विवेक कडु** दि.02.02.2020 Mangrove destruction near Chirle, Uran | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, रायगड **(अहवाल अप्राप्त)** |
| ७७ | **तक्रार क्र. १३६ श्री. प्रसाद खाले दि.१६.१०.२०२०** Destruction of Mangroves at Bhagat Aali, Awas, Alibaug | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, रायगड **(अहवाल अप्राप्त)** |

**पालघर जिल्हयातील कांदळवन तक्रारी**

| अ.क्र. | तक्रार | करावयाचीकार्यवाही | अंमलबजावणीकरणारीयंत्रणा |
|---|---|---|---|
| ७८ | **तक्रार क्र. ६७** श्री. वैभव – दि. २९.०३.२०१९ तलाठी सजा मौजे जूचंद्र तालुका - वसई जि. पालघर येथील सर्व्हे ८५ हिस्सा नं. ५ बी | • निवासी उपजिल्हाधिकारी पलघर यांच्या दि. ०९.११.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी वसई यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून सदर ठिकाणी सं.नं. ८५/५/ब , क्षेत्र ०.१५.२० हे आर. या खाजगी जागेवर डेब्रिजचा भराव करुन रस्ता तयार करण्यात आलेला आहे. सदर डेब्रिजच्या भरावाखाली कांदळवनाची झाडे गाडली गेल्याचे निदर्शनास आल्याने प्रकरणी श्रीम. मिनल गोविंदराव पाटील व इतर ८ यांच्यावर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ व १७ अन्वये पोलीस स्टेशन वालीव येथे दि. २४.१०.२०२० रोजी गुन्हा नं. ०८७६/२०२० अन्वये दाखल करण्यात आलेला आहे. तरी सदर तक्रार निकाली काढण्यास विनंती केली आहे. | जिल्हाधिकारी पालघर **(अहवाल प्राप्त)** |
| ७९ | **तक्रार क्र. ८५**श्री. दिनार कृष्णा म्हात्रे- दि. ११.०७.२०१९कांदळवनाची बेसूमार तोड करुन पर्यावरणाचा ऱ्हास केल्याबाबत. | | |
| ८० | **तक्रार क्र. १२८** समर्थन लाईव्ह दि.१७.०७.२०२० डहाणू तालुक्यातील वडकून | • निवासी उपजिल्हाधिकारी पलघर यांच्या दि. ०९.११.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी डहाणू यांचेमार्फत | जिल्हाधिकारी पालघर **(अहवाल प्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | येथे कांदळवन क्षेत्रात कोळंबी प्रकल्प चालू असलेबाबत. | चौकशी करण्यात आली असून सदर ठिकाणी ग.न. २३४/१ क्षेत्र ३५२.८६हे. आर. या जमीनीच्या कब्जेदार सदरी बिन आकारी पडीत अशी नोंद आहे. सदर जमीनमध्ये सन २००२ पासून एकूण १० कोळंबी भाडेपट्टाधरकांना कोळंबी व मिठागरे प्रयोजनार्थ परवानगी देण्यात आलेली आहे.<br>• जमीन कोळंबी प्रकल्प व मिठागरे प्रयोजनार्थ दिलेली असून उर्वरित जमीन ही खाडी व खाजण स्वरुपाची आहे. सदर जागेमध्ये भाडेपट्टा कोळंबी प्रकल्प व मिठागरे असून अंदाजे काही प्रकल्प २५ ते ३० वर्षापासूनचे आहे. आजरोजी सदर जागेवर कोळंबी प्रकल्प चालू आहे. नव्याने तलाव तयार केलेले नाही. तसेच आज रोजी तिवराच्या झाडाची तोड झालेली दिसून येत नाही.प्रकरणी कोळंबी प्रकल्पांना भेट दिली असता कोळंबी तलाव हे जुने असल्याने पूर्वी तिवरांच्या झाडाची तोड झाली अथवा नाही हे सांगणे अशक्य असल्याचा अहवाल सादर केलेला आहे. तसेच २००९ नंतर या जिल्हयात कोळंबी संवर्धनाकरिता शासकीय जमीन दिल्याचे दिसून येत नाही. | |
| ८१ | **तक्रार क्र. १२९** श्री. मर्सेलीन कोरीया दि.२९.०७.२०२० मौजे टेंभी भुमापन क्र. 117 हि. क्र. ०१ शासकीय जमिनवीर कांदळवन कत्तल / पाणथळ क्षेत्राचा नाश | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी पालघर यांच्या दि.२१.१०.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर तक्रारीबाबत उपविभागीय अधिकारी, वसई यांचेमार्फत करण्यात चौकशी करण्यात आली असून सदर ठिकाणी भूमापन क्र. ११७ हि.क्र.०१ येथे कांदळवनाची कत्तल केल्याचे दिसून आलेले नाही. | जिल्हाधिकारी पालघर |
| ८२ | **तक्रार क्र. १३४ श्रीमती श्वेता भट दि.११.०५.२०२०** Destruction of mangroves at Sasunavghar, Vasai, Palghar | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी पालघर |

**(अण्णासाहेब मिसाळ)**
**अध्यक्ष,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग**